19 DEC 2001

शाखाधिकारी

उप मु.का.अ.   मु.का.अ.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनांतर्गत पर्यवेक्षिका पदाच्या एकूण मंजूर पदापैकी २५% पदे भरण्याकरीता निवड समित्यांची स्थापना करणेबाबत.

जिल्हा परिषद नंदुरबार
महिला व बालकल्याण विभाग
20 DEC 2001
का.अ.   उप मु.का.अ.(बा.वि.)

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग,
शासन निर्णय क्रमांक : एबावि २००१/ प्र.क्र.१४६/का.६
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला, मंत्रालय, मुंबई -३२.
दिनांक : ७ डिसेंबर, २००१.

वाचा : शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक -एबावि २००१/ प्र.क्र.१४६/का.६, दिनांक १७ नोव्हेंबर, २००१.

**निर्णय :** एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या पर्यवेक्षिकांच्या ( मुख्यसेविका ) एकूण पदापैकी २५% पदे अहर्ता प्राप्त ( मॅट्रीक्यूलेट ) व १० वर्षे मानधनी सेवा झालेल्या अंगणवाडी सेविकांमधून भरणे आणि सदर पद भरती बाबतची कार्यपध्दती याबाबतचे आदेश, शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक : एबावि २००१/ प्र.क्र.१४६/का.६, दिनांक १७.११.२००१ अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयातील परिच्छेद २ ( ३ ) (ब ) अन्वये निर्गमित केलेल्या वयोमर्यादेबाबतच्या आदेशांऐवजी खालीलप्रमाणे सुधारीत आदेश निर्गमित करण्यात येत आहेत :-

परिच्छेद २ (३) (ब)- **" सदर २५% पद भरतीसाठी ५५ वर्षापर्यंतच्या अंगणवाडी सेविका पात्र राहतील. त्यामुळे पर्यवेक्षिकेच्या पदावरील निवडीसाठी घ्यावयाच्या लेखी परिक्षेच्या दिनांकास ज्या अंगणवाडी सेविकांचे वय ५५ वर्षापर्यंत आहे अशाच अंगणवाडी सेविकांचे अर्ज मागवावेत व त्याच अंगणवाडी सेविका निवडीसाठी पात्र राहतील. "**

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( ग.गो. पंचभाई )
शासनाचे उप सचिव.

**प्रति,**
मा. मंत्री, (महिला व बाल विकास ), मंत्रालय, मुंबई.
मा. राज्यमंत्री, (महिला व बाल विकास ), मंत्रालय, मुंबई.
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय, कोकण भवन, नवी मुंबई.

Scanned with OKEN Scanner